# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 22/05/2020 (शुक्रवार)
(सकाळ)

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरूद्व गुन्हा नोंद

1) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 07 कि. मी अंतरावर मौजा गोंडेगाव शेत शिवार येथे दिनांक 21/05/2020 चे 17.30 वा. ते 18:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– युवनेश रामचंद्र डवरे(जखमी), वय 45 वर्ष, रा. मानिकवाडा यांचे वडील आरोपी नामे– रामचंद्र डवरे, वय 80 वर्ष, रा. मानिकवाडा यांनी शेतीचे वहिवाट व शेतीच्या उत्पन्नाच्या वादावरून फिर्यादी हे शेतातील संत्र्याच्या झाडा खाली बसले होते. दरम्यान आरोपीने फिर्यादींच्या मागुन येवुन त्यांच्या अंगावर पेट्रोल टाकुन जळत्या टेंब्याने आग लावले. त्यामुळे फिर्यादींच्या डोक्याचा भाग, कपाळ, मान, दोन्ही हाताचे खांदे व दोन्ही हाताचे बोटे जळाले आरोपी वडीलांनी जीव घेण्याचे उद्‌देशाने पेट्रोल टाकुन जाळुन गंभीर दुखापत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 307 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. मल्लिकार्जुन इंगळे 9011901188 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 16 कि. मी अंतरावर मौजा बंडु ढाब्याजवळ आशिष ऑटोमोबाईल व पेट्रोलिंगच्या बाजुला, कळमेश्वर जि. नागपूर येथे दिनांक 19/05/2020 चे 21.00 वा. दरम्यान फिर्यादींचे भाऊ नामे– शहबाज मुस्ताक शेख, वय 25 वर्ष, रा. नागपुर हे त्यांच्या राहत्या घरून डी.एच.एल कंपनीमध्ये चालक म्हणुन नौकरीला असल्याने त्या ठिकाणी त्यांची एमएच–49/पी–9078 क्रमांकाची हीरो पॅशन प्रो मोटरसायकल या गाडीने डयुटीवर जात होते. दरम्यान रत्यावर काही अज्ञात आरोपीतांनी अज्ञात कारणातुन शहबाज शेख यांना काठीने व रॉडने डोक्यावर, चेहऱ्यावर मारहाण करून गंभीर दुखापत करून जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांच्या गाडीची तोडफोड करून नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दानिश मुस्ताक शेख, वय 21 वर्ष, रा. यशोधरा नगर, नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 307, 427, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. मारूती मुळूक हे करीत आहे.

## चोरी

1) पो.स्टे. कोढांळी :– अंतर्गत 15 कि.मी अंतरावर मौजा बाजारगाव येथे दिनांक 21/05/2020 चे 01.50 वा. दरम्यान 3 अज्ञात आरोपीतांनी संगनमत करून बॅंक ऑफ इंडिया बाजारगाव येथील ए.टी. एम. मशिनची तोडफोड करून नुकसान केले. तसेच आरोपीतांनी ए.टी.एम. मधील पैसे चोरी करण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380, 511, 427, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि ढगे 9518979499 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावर वार्ड क्र. 1, खापरखेडा येथे दिनांक 18/05/2020 चे 02.00 वा. ते 02.30 वा. दरम्यान फियादी नामे– सुमित केवलराम सोनकर, वय 29 वर्ष, रा. चनकापुर वार्ड क्र. 01 खापरखेडा यांचे प्लॉट वरिल रूमचा अज्ञात चार आरोपीतांनी कुलूप तोडुन घराचे आत प्रवेश केले. यानंतर आरोपीने रूमच्या आतमध्ये ठेवलेले सामान 11 के.जी ब्रेकर मशिन अंदाजे कि. 20,000/– रू., मोठी ड्रिल मशिन अंदाजे कि. 6,000/– रू., लोहा कापण्याची मशिन अंदाजे कि. 2,000/– रू. छोटी ड्रिल मशिन अंदाजे कि. 2,000/– रू, ग्रॅंडर मशिन अंदाजे कि. 2,000/– रू असा एकुण 32,000/– रू चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा सुर्यभान जळते हे करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. मौदा :– 27 वर्षीय फिर्यादी/पीडिता या घरी हजर असतांना काम करून झाल्यानंतर दि. 19/05/2020 चे 19:30 वा. सुमारास दारात उभ्या असतांना फिर्यादींचे सासरे आरोपी नामे क्र. 1) गळीराम मारोती चोपकर, रा. दहेगाव मौदा, जि. नागपूर हे मागवून आले व फिर्यादीस मनास लज्जा उत्पन्न होईल असे बोलुन व कृत्य करून तिचा विनयभंग केला. त्यामुळे फिर्यादी या घाबरून शेजाऱ्यांच्या घरी पडत गेल्या. यानंतर फिर्यादींनी सर्व हकीकत तिच्या वडिलांना फोनवर सांगीतले. रात्री 10.30 ला फिर्यादीचे पती आरोपी नामे क्र. 2) अनिल गळीराम चोपकर, रा. दहेगाव मौदा, जि. नागपूर शेजाऱ्यांच्या घरी आले व फिर्यादीला मारायला लागले व फिर्यादीस खाली पाडले व तीथुन घरापर्यंत ओढत नेले. यामुळे फिर्यादीला हाता–पायाला खरचटले सारखा मार लागला आहे. दि 20/05/2020 चे सकाळी 07.00 वा. फिर्यादी यांनी पतीला चहा दिला असता पती म्हणाले की, ''माझ्या आई– वडिलांना उलट का बोलते,'' असे म्हणुन फिर्यादीची गच्ची पकडली काही वेळाने फिर्यादीचे

वडिल आले असता फिर्यादी या वडिलांसोबत व तिच्या दोन्ही मुलांसह भंडारा येथे जात असता पतीने ''तुमची मुलगी पुन्हा माझ्या घरी आली तर जिवाने मारून टाकीन अशी धमकी दिली.''

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ), 354, 323, 506, 34 भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ठाकुर 7083159993 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर